# ‘विश्वकर्मा’तर्फे ‘आयबीएम दिवस’

पुणे : विश्वकर्मा विद्यापीठाच्या कॅम्पसवर नुकतेच एक अनोखे चित्र दिसले. एरवी उद्योग क्षेत्रातील अनुभवासाठी विद्यार्थी कंपन्यांमध्ये जातात. मात्र, १६ ऑक्टोबरला आयबीएमसारखी शतकाहून जुनी आणि प्रसिद्ध कंपनी खुद्द विश्वकर्मा विद्यापीठाच्या कॅम्पसवर आली होती.

निमित्त होते ‘आयबीएम दिवस’ या कार्यक्रमाचे. विश्वकर्मा विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण, शोधनिबंध सादरीकरण आणि प्रदर्शन अशा माध्यमांतून आपले कौशल्य आयबीएमच्या प्रतिनिधींसमोर सादर केले. आयबीएमच्या उपस्थित अधिकाऱ्यांनीही मग विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या शंकाचे निरसन केले आणि नव्या कल्पनाही दिल्या.

आयबीएम आणि विश्वकर्मा विद्यापीठाचे शैक्षणिक सहकार्य असून, त्याअंतर्गत हा ‘आयबीएम दिवस’ साजरा करण्यात आला. विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेचे १५०हून अधिक विद्यार्थी; तसेच प्राध्यापकही या उपक्रमात सहभागी झाले. आयबीएम सिस्टीम्स टेक्निकल युनिव्हर्सिटीचे हरी सुब्रमणियन, विकारुद्दीन सुर्की, विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. वासुदेव गाडे आदी या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी ‘करंट ट्रेंड्स इन सॉफ्टवेअर’ आणि ‘ओपन सोर्स सॉफ्टवेअर’ या विषयांवर प्रदर्शन आयोजित केले होते. ‘अंडरवॉटर कम्युनिकेशन’, ‘लिंक्डइन ॲनॅलिटिक्स’, ‘इंटेलिजंट कार पार्किंग सिस्टीम्स’ आणि ‘फाउंड्री ऑटोमेशन’ आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

### ‘इलेक्ट्रॉनिक बॅज’ संकल्पना

आयबीएमबरोबर शैक्षणिक सहकार्य असल्याने विश्वकर्मा विद्यापीठातील विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रम पूर्ण करतानाच आयबीएमचे कोर्सही पूर्ण करता येणार आहेत. हे कोर्स पूर्ण केल्यावर त्यांना इलेक्ट्रॉनिक बॅज देण्यात येतील, जी कोर्स पूर्ण केल्याची अधिकृत पोचपावती असेल. आयबीएमच्या कोर्सना बाजारपेठेत असलेले महत्त्व लक्षात घेता, विद्यार्थ्यांना नोकरीच्या मुलाखतीच्या वेळी इतर प्रमाणपत्रांबरोबरच हे इलेक्ट्रॉनिक बॅज हा महत्त्वाचा दस्तावेज ठरणार आहे.

कॅम
हॅपी